लिपिक - टंकलेखक (मराठी व इंग्रजी) परीक्षा - 2011

# A

परीक्षा दि : 18-12-2011

Code : TRM

प्रश्नपुस्तिका क्रमांक
BOOKLET No. 214997

## प्रश्नपुस्तिका

एकूण प्रश्न : 200

वेळ : 2 (दोन) तास — मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान, बुद्धिमापन चाचणी व अंकगणित — एकूण गुण : 400

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 200 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून त्वरित बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

परीक्षा-क्रमांक [ | | | | | | | | ]
केंद्राची संकेताक्षरे — शेवटचा अंक

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नांकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची अचूक उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नांचे गुण वजा करण्यात येतील".**

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

SEAL

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरुद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

1. शब्दांच्या समुच्चयाने एक विचार पूर्ण व्यक्त होतो. त्यास व्याकरणात काय म्हणतात ?
(1) वाक्य (2) शब्द (3) पद (4) धातू

2. पुढीलपैकी कोणता शब्द देशी आहे ?
(1) सर्कस (2) इनाम (3) दगड (4) अण्णा

3. 'डोके' हा शब्द खालीलपैकी कोणत्या प्रकारात मोडणारा आहे ?
(1) तत्सम (2) तद्भव (3) देशी (4) परभाषिय

4. 'गोलंदाजी करावी ती कुंबळेनेच'. यातून काय सूचित होते ?
(1) योग्यता (2) शक्यता (3) तर्क (4) कर्तव्य

5. तृतीया विभक्तीचा कारकार्थ कोणता ?
(1) कर्म (2) करण (3) संप्रदान (4) कर्ता

6. "कर्तव्यदक्ष" या शब्दाला समानार्थी शब्द कोणता/कोणते ?
(1) कर्तव्य परायण (2) कर्तव्य तत्पर (3) कर्तव्याला जागणारा (4) तिन्ही बरोबर

7. अभ्यस्त शब्द ओळखा.
(1) मधूनमधून (2) दुधाळ (3) देणेकरी (4) कामकरी

8. 'समोर' हे शब्दयोगी अव्यय कोणत्या उपप्रकारातील आहे ?
(1) कालवाचक (2) स्थलवाचक (3) हेतुवाचक (4) तुलनावाचक

9. खालीलपैकी कोणत्या शब्दाचे रूप बरोबर लिहिलेले नाही ?
(1) पारंपरिक (2) शारीरिक (3) भूकेला (4) क्षितिज

10. 'चक्रपाणि' या सामासिक शब्दाचा विग्रह करून समास ओळखा.
(1) मध्यमपद लोपी समास (2) समाहार द्वंद्व
(3) अव्ययी भाव (4) बहुव्रीही

11. 'वराती मागून घोडे' वाक्प्रचाराचा अर्थ सांगा.
(1) प्रथम वरात नंतर घोडे (2) वराती मधील घोडे
(3) घोड्यावर वरात काढणे (4) काम संपल्यावर मदतीला येणे

12. 'तो रडता रडता थांबला', हे वाक्य कोणत्या प्रकारातील आहे ?
(1) विशेषण (2) शब्दयोगी अव्यय (3) केवलप्रयोगी अव्यय (4) कृदन्त



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

13. तिथी, वार, नक्षत्र, योग, करण या पाच घटकांनी युक्त अशा दिन-वैशिष्ट्यांची माहिती असणारी पुस्तिका कोणती ?
(1) पंचीकरण (2) पंचांग (3) पंचशील (4) पंचीकृत

14. पुढील वाक्यातील अधोरेखित शब्दाची जात ओळखा.
"<u>जो</u> मुलगा अभ्यास करील तो पास होईल."
(1) दर्शक सर्वनाम (2) संबंधी सर्वनाम (3) अनिश्चित सर्वनाम (4) प्रश्नार्थक सर्वनाम

15. योग्य शब्द भरा.
"भारतीय संस्कृतीत कल्पवृक्ष नावाची एक ____________ आहे."
(1) परंपरा (2) कथा (3) परिकल्पना (4) कादंबरी

16. पुढीलपैकी कोणता शब्द भाववाचक नाम आहे ?
(1) सुंदरा (2) गुलाम (3) पाटीलकी (4) पाटील

17. 'लेखणी' हे कोणत्या प्रकारचे नाम आहे ?
(1) विशेषनाम (2) सामान्यनाम (3) भाववाचकनाम (4) सर्वनाम

18. विचार व्यक्त करण्यासाठी मानवाला मिळालेले मुख्य साधन कोणते ?
(1) मित्र (2) भाषा (3) भावना (4) समाज

19. आपल्या तोंडावाटे निघणाऱ्या मूलध्वनींना काय म्हंटले जाते ?
(1) अक्षर (2) वर्ण (3) पद (4) वाक्य

20. पुढील वाक्यातील गाळलेल्या जागी योग्य शब्दाची निवड करा.
"____________ विचार झटकून आधुनिक विज्ञानप्रणीत विचारांचा अंगीकार करायला हवा."
(1) कालसापेक्ष (2) कालबाह्य (3) कालचे (4) कालातीत

21. पुढील वाक्यातील आशय एका शब्दात लिहा.
'केलेले उपकार जाणणारी व्यक्ती'.
(1) कृतघ्न (2) कृतज्ञ (3) कृपण (4) कृदन्त

22. पुढे दिलेल्या शब्दांतील व्याकरणदृष्ट्या योग्य शब्द कोणता ?
(1) जाहिरात (2) जाहीरात (3) ज्याईरात (4) जाहरात

23. धातू ओळखण्याचे अक्षर कोणते ?
(1) नी (2) णा (3) ने (4) णे

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**24.** 'विद्यार्थ्याला बक्षिस दिले' हे कोणते कारक आहे ?

(1) अपादान (2) संप्रदान (3) अधिकरण (4) करण

---

**25.** "तोंड दाबून बुक्क्यांचा मार" म्हणजे काय ?

(1) तोंडून शब्द न फुटणे
(2) मुकाट्याने दु:ख सहन करणे
(3) तोंड बंद ठेवणे
(4) दुसऱ्याला त्रास देणे

---

**26.** 'मी पुस्तक वाचत असे' या वाक्यातील काळ ओळखा.

(1) रीती भूतकाळ (2) रीती वर्तमानकाळ (3) साधा भूतकाळ (4) पूर्ण भूतकाळ

---

**27.** अधोरेखित नामाचे वचन ओळखा "स्नेहलने <u>ग्रंथ</u> वाचले".

(1) एकवचन (2) द्विवचन (3) अनेकवचन (4) अनामवचन

---

**28.** "घनश्याम सुंदरा श्रीधरा अरुणोदय झाला" – या गीतातून कोणत्या रसाचा प्रत्यय येतो ?

(1) वीररस (2) करुणरस (3) शृंगाररस (4) शांतरस

---

**29.** मराठी वर्णमालेतील 'ह' हा कोणता वर्ण आहे ?

(1) महाप्राण (2) अल्पप्राण (3) लघुप्राण (4) दीर्घप्राण

---

**30.** 'वाङ्मय' या शब्दातील संधी सोडवा.

(1) वाग् + मय (2) वाक् + अमय (3) वाक् + मय (4) वांग + मय

---

**31.** 'य-य-य-य' हे कोणत्या अक्षरवृत्ताचे गण आहेत ?

(1) इंद्रवज्रा (2) भुजंग प्रयात (3) वसंत तिलका (4) पृथ्वी

---

**32.** रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

"मूळचे संस्कृत शब्द जसेच्या तसे मराठीत आलेले आहेत, त्यांना ____________ शब्द म्हणतात.

(1) तद्‌भव (2) कृदन्त (3) साधित (4) तत्सम

---

**33.** रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

"वाक्य व त्याचा अर्थ पूर्ण झाला म्हणजे ____________ येतो.

(1) अर्धविराम (2) अपूर्णविराम (3) स्वल्पविराम (4) पूर्णविराम

---

**34.** शब्दरचनेच्या दृष्टीने पुढील वाक्यांतील <u>निर्दोषवाक्य</u> कोणते ?

(1) मेहनत एक करतो आणि त्याचा फायदा दुसराच घेतो.
(2) एक जण मेहनत करतो, त्याचा फायदा मात्र दुसराच घेतो.
(3) मेहनत एकाने करायची आणि फायदा दुसऱ्याने घ्यायचा.
(4) एकाने मेहनत करायची व दुसऱ्याने त्याचा फायदा घ्यायचा.

---

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

35. 'नागपूरची संत्री' हे कोणते विशेषण आहे ?
(1) सर्वनाम साधित विशेषण
(2) धातूसाधित विशेषण
(3) अव्ययसाधित विशेषण
(4) नामसाधित विशेषण

36. 'निर्वासित' या शब्दाचा अर्थ लिहा.
(1) परदेशात राहाणारा
(2) देश सोडून गेलेला
(3) घरादारास व देशास पारखा झालेला
(4) देशात राहाणारा

37. अधोरेखित नामाची विभक्ती ओळखा.
"तुझ्याहून श्रेष्ठ माणसे या जगात आहेत."
(1) अष्टमी (2) सप्तमी (3) षष्ठी (4) पंचमी

38. द्राविडी प्राणायाम म्हणजे काय ?
(1) साध्या सरळ बाबीसाठी गुंतागुंतीचे प्रयत्न करणे
(2) केवळ देखावा करणे
(3) विशिष्ट तऱ्हेचा व्यायाम करणे
(4) एखादे दिवशी व्यायाम न करणे

39. पुढील वाक्प्रचाराचा अर्थ ओळखा 'मूग गिळणे'
(1) काहीही खाणे (2) वाईट वाटून घेणे (3) गप्प राहणे (4) अबोला धरणे

40. 'विटीदांडू' हे कोणत्या समासाचे उदाहरण आहे ?
(1) वैकल्पिक द्वंद्व (2) समाहार द्वंद्व (3) इतरेतर द्वंद्व (4) कोणताही नाही

41. पुढीलपैकी कोणते सर्वनाम आत्मवाचक सर्वनाम आहे ?
(1) तुम्ही (2) आम्ही (3) ते (4) मी स्वत:

42. 'आम्ही गहू खातो' या वाक्यातून शब्द शक्तीचा कोणता अर्थ व्यक्त होतो ?
(1) वाच्यार्थ (2) व्यंग्यार्थ (3) लक्ष्यार्थ (4) भावार्थ

43. 'आई-बापा प्रमाणेच त्यांच्या अपत्यांनी ही वागणे' या आशयाची म्हण ओळखा.
(1) करावे तसे भरावे (2) चार दिवस सासूचे (3) खाण तशी माती (4) गर्वाचे घर खाली

44. 'कवी' या पुल्लिंगी नामाचे स्त्रीलिंगी रूप लिहा.
(1) कविता (2) कवयित्री (3) कवित्री (4) कवियित्री

45. 'इतिश्री होणे' म्हणजे काय ?
(1) शेवट होणे (2) प्रारंभ होणे (3) श्रीमंत होणे (4) गरीब होणे

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**46.** योग्य शब्द लिहा.

इ, ए, ऋ हे ____________ स्वर आहेत.

(1) ऱ्हस्व (2) दीर्घ (3) संयुक्त (4) विजातीय

---

**47.** पुढील शब्दांपैकी व्याकरणदृष्ट्या योग्य शब्द कोणता ?

(1) मनस्थीती (2) मनस्थिति: (3) मन्हस्थिती (4) मन:स्थिती

---

**48.** "गणपत वाणी विडी पितांना,

चावायचा नुसतिच काडी ;

म्हणायचा अन् मनाशीच की,

ह्या जागेवर बांधिन माडी"

या काव्यरचनेतील अलंकार ओळखा.

(1) रूपक (2) स्वभावोक्ती (3) उत्प्रेक्षा (4) अनुप्रास

---

**49.** 'पुढारी' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द कोणता ?

(1) अनुनय (2) अनुयायी (3) अनुभूती (4) अनुचित

---

**50.** संधी म्हणजे काय ?

(1) सांधणे (2) सांगणे (3) सामावणे (4) समजावणे

---

**51.** स्त्री-भ्रूण हत्येविरुद्ध जनजागृती करणारा महाराष्ट्रातील लोकप्रतिनिधी कोण ?

(1) शरद पवार (2) सुप्रिया सुळे (3) आर. आर. पाटील (4) पृथ्वीराज चव्हाण

---

**52.** स्वतंत्र पाकिस्तानच्या निर्मितीची योजना कोणी मांडली ?

(1) बॅ. जीना (2) रहमत अली (3) महंमद इकबाल (4) मौलाना आझाद

---

**53.** खालीलपैकी कोणत्या ठिकाणी मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ नाही ?

(1) औरंगाबाद (2) नागपूर (3) पणजी (4) पुणे

---

**54.** म. गांधीनी पहिले वैयक्तिक सत्याग्रही म्हणून कोणाची निवड केली ?

(1) पं. जवाहरलाल नेहरु (2) पं. मोतीलाल नेहरु

(3) विनोबा भावे (4) आचार्य कृपलानी

---

**55.** तेजस्वीनी सावंत हे नाव खालीलपैकी कोणत्या क्रीडा प्रकाराशी संबंधित आहे ?

(1) नेमबाजी (2) कुस्ती (3) बास्केट बॉल (4) धावपटू

---



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

56. खगोलीय घटनांचा अभ्यास करण्यासाठी महाराष्ट्रात रेडिओ दुर्बिण कोठे उभारण्यात आली आहे ?
(1) नारायणगांव (2) आंबोली (3) अलिबाग (4) नागपूर

57. भारतीय नागरिकत्वाचा लोप पुढील कोणत्या कारणामुळे होत नाही ?
(1) एखाद्या व्यक्तीने अन्य देशाचे नागरिकत्व स्वीकारण्यासाठी भारतीय नागरिकत्वाचा त्याग करण्याचे ठरविले व त्यासाठी तसा अर्ज केला ती व्यक्ती
(2) अन्य कोणत्याही देशाचे नागरिकत्व स्वीकारणारी भारतीय व्यक्ती
(3) हेरगिरी, देशद्रोह यां सारखे गंभीर गुन्हे करणारी व्यक्ती
(4) भ्रष्ट मार्गाने संपत्ती मिळवून, गैर व्यवहार करून न्यायालयात दोषी ठरणारी व्यक्ती

58. शिवाजी महाराजांचा जन्म महाराष्ट्रातील कोणत्या किल्ल्यावर झाला ?
(1) शिवनेरी (2) सिंहगड (3) पुरंदर (4) प्रतापगड

59. महाराष्ट्रातील मोसमी पाऊस हा प्रामुख्याने खालीलपैकी कोणत्या प्रकारात मोडतो ?
(1) ईशान्य मोसमी (2) नैर्ऋत्य मोसमी (3) वळीव (4) वादळी

60. महाराष्ट्रातील कोकणपट्टीची रुंदी सर्वसाधारणपणे ______________ आहे.
(1) 52-60 कि. मी. (2) 42-50 कि. मी. (3) 32-40 कि. मी. (4) 62-70 कि. मी.

61. खडकवासला विधानसभा मतदार संघ हा कोणत्या लोकसभा मतदार संघाचा भाग आहे ?
(1) पुणे (2) बारामती (3) सातारा (4) मावळ

62. खालीलपैकी कोणत्या ठिकाणी दैनिक तापमान कक्षा सर्वात जास्त आढळते ?
(1) सातारा (2) आंबोली (3) अलिबाग (4) नागपूर

63. गोपाळ हरि देशमुख हे कोणत्या टोपण नावाने प्रसिद्ध होते ?
(1) सुधारक (2) न्यायमूर्ती (3) लोकहितवादी (4) मवाळ नेते

64. राष्ट्रीय चित्रफित संग्रहालयाचे मुख्य केंद्र खालीलपैकी कोठे आहे ?
(1) मुंबई (2) औरंगाबाद (3) कोल्हापूर (4) पुणे

65. विश्वकोश या प्रसिद्ध मराठी ज्ञानकोशाचे संपादन खालीलपैकी प्रामुख्याने कोणी केले ?
(1) पां. वा. काणे (2) लक्ष्मणशास्त्री जोशी (3) भीमराव आंबेडकर (4) विजया वाड

66. तिसरे इंग्रज–मराठा युद्धातील मराठ्यांचा सेनापती कोण होता ?
(1) त्रिंबकजी डेंगळे (2) गंगाधर शास्त्री (3) बापू गोखले (4) यशवंतराव होळकर

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

67. महाराष्ट्राचे एकूण किती प्रशासकीय विभाग आहेत ?

(1) चार (2) पाच (3) सहा (4) सात

68. ''औंढा नागनाथ'' हे प्रसिद्ध ज्योतिर्लिंग खालीलपैकी कोणत्या जिल्ह्यात आहे ?

(1) बीड (2) परभणी (3) औरंगाबाद (4) अहमदनगर

69. इ. स. 1857 चा उठाव नागपूर येथे अयशस्वी कां झाला ? त्याचे महत्त्वाचे कारण कोणते ?

(1) नागपूर येथे राष्ट्रवादी भावनेचा अभाव होता.

(2) ब्रिटिशांकडे आधुनिक शस्त्रास्त्रे होती.

(3) नागपूरकरांमध्ये एक वाक्यता नव्हती.

(4) नागपूरची राणी बाकाबाई ही ब्रिटिशांशी एकनिष्ठ राहिली.

70. महाराष्ट्र राज्याची निर्मिती केंव्हा झाली ?

(1) 1 मे 1961 (2) 1 मे 1960 (3) 15 ऑगस्ट 1960 (4) 26 जानेवारी 1961

71. रोजगार हमी योजनेअंतर्गत खालीलपैकी कोणता प्रकल्प अंतर्भूत केलेला नाही ?

(1) मृद्संधारण (2) रस्ते विकास (3) विमानतळ विकास (4) जलसिंचन

72. खालीलपैकी कोणते तत्त्वज्ञान सत्यशोधक समाजाचे नाही ?

(1) जगात ईश्वर एकच असून त्याचे स्वरूप सर्वव्यापी, निर्गुण व निर्विकारी आहे

(2) सर्व मानवप्राणी त्याची लेकरे आहेत

(3) भिन्न भिन्न धर्मांमध्ये ईश्वरविषयक विविध कल्पना असल्या तरी ती सर्वशक्तिमान अशा एकाच परमेश्वराची स्वरूपे आहेत असे मानणे

(4) मनुष्य प्राणी हा गुणाने श्रेष्ठ ठरतो, जातीने नाही

73. खालीलपैकी महाराष्ट्राच्या उपराजधानीचे शहर कोणते ?

(1) नागपूर (2) पुणे (3) मुंबई (4) अमरावती

74. बकिंगहॅम कालवा खालीलपैकी कोणत्या राज्यात स्थित आहे ?

(1) पंजाब व हरियाणा (2) महाराष्ट्र व गोवा

(3) आंध्रप्रदेश व तामिळनाडू (4) केरळ व कर्नाटक

75. विष्णुशास्त्री पंडित यांनी कोणत्या वृत्तपत्रातून विधवांच्या दुःखांना वाचा फोडली ?

(1) संवाद कौमुदी (2) पूना ऑब्झर्व्हर (3) सुधारक (4) इंदुप्रकाश



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

76. महाराष्ट्रातील सर्वात उंच शिखर कोणते आहे ?

(1) महाबळेश्वर (2) कळसुबाई (3) अस्तंभा (4) साल्हेर

77. खालीलपैकी कोणती बँक व्यक्तीगत खाते उघडण्यास प्रतिबंध करते ?

(1) स्टेट बँक ऑफ इंडिया (2) रिझर्व्ह बँक

(3) युनिअन बँक (4) कॅनरा बँक

78. महाराष्ट्रातील पहिल्या बंडखोर विचारवंत ज्यांनी 'स्त्री–पुरुष तुलना' नावाचा ग्रंथ लिहिला त्यांचे नाव काय ?

(1) रमाबाई रानडे (2) ताराबाई शिंदे (3) सावित्रीबाई फुले (4) पंडिता रमाबाई

79. महाराष्ट्रातील सर्वात लांब आणि प्रमुख नदी कोणती आहे ?

(1) नर्मदा (2) तापी (3) भीमा (4) गोदावरी

80. महाराष्ट्र राज्यात सर्वात कमी लोकसंख्या खालीलपैकी कोणत्या जिल्ह्यात आहे ?

(1) ठाणे (2) औरंगाबाद (3) रायगड (4) सिंधुदुर्ग

81. खालीलपैकी कोणते वृत्तपत्र डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुरु केले नव्हते ?

(1) सुधारक (2) जनता (3) समता (4) प्रबुद्धभारत

82. डॉ. इंदिरा हिंदुजा या खालीलपैकी कोणत्या क्षेत्रातील तज्ञ समजल्या जातात ?

(1) स्त्रीरोग (2) वारली चित्रकला (3) नृत्यक्षेत्र (4) समाजकार्य

83. महाराष्ट्रातील हळद आणि आले यांचे उत्पादन करणारे जिल्हे कोणते ?

(1) सातारा आणि सांगली (2) कोल्हापूर आणि पुणे

(3) परभणी आणि नांदेड (4) कोल्हापूर आणि सोलापूर

84. महाराष्ट्रात 'मालवणी' ही भाषा प्रामुख्याने कोठे बोलली जाते ?

(1) पश्चिम महाराष्ट्र (2) खानदेश (3) कोकण (4) पठार

85. क्षेत्रफळाच्या दृष्टीने महाराष्ट्रातील कोणता जिल्हा सर्वात लहान आहे ?

(1) अकोला (2) हिंगोली (3) वाशिम (4) मुंबई शहर

86. ब्रिटिश सत्तेविरुद्ध उठाव करणारे क्रांतिकारक उमाजी नाईक व वासुदेव बळवंत फडके यांच्या समोर कोणाचा आदर्श होता ?

(1) न्या. म. गो. रानडे (2) छ. शिवाजी महाराज

(3) गणेश वासुदेव जोशी (4) स्वा. वि. दा. सावरकर

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

87. मँगनीजचे साठे महाराष्ट्रात पुढीलपैकी कोणत्या जिल्ह्यात आढळतात ?

(1) नागपूर (2) वाशिम (3) चंद्रपूर (4) गडचिरोली

88. भारताने आजपर्यंत किती आण्विक चाचण्या केल्या ?

(1) दोन (2) एक (3) पाच (4) तीन

89. राष्ट्रीय सभेची (काँग्रेस) स्थापना होण्यापूर्वी अखिल भारतीय चळवळीचे केंद्र बनावी यासाठी कोलकत्ता येथे कोणती राजकीय संघटना कार्यरत होती ?

(1) सार्वजनिक सभा (2) महाजन सभा (3) प्रार्थना समाज (4) इंडियन असोसिएशन

90. महाराष्ट्रात तारापूर या ठिकाणी कुठल्या प्रकारची विद्युत निर्मिती केली जाते ?

(1) औष्णिक (2) जलविद्युत (3) पवनविद्युत (4) अणुऊर्जा

**91 व 92 साठी**

X हा Z पेक्षा उंच, पण W पेक्षा बुटका आहे, W हा Y पेक्षा उंच पण V पेक्षा बुटका आहे, Y हा Z पेक्षा उंच पण X पेक्षा बुटका आहे, वरील माहितीवरून पुढील दोन प्रश्नांची उत्तरे द्या.

91. सर्वात उंच कोण ?

(1) V (2) W (3) X (4) Y


92. सर्वात बुटका कोण ?

(1) W (2) X (3) Y (4) Z

93. जर 1156 : 34 तर 2916 : ?

(1) 54 (2) 44 (3) 64 (4) 36

94. खालील आकृतीतील प्रश्न चिन्हाच्या जागी असलेला अंक निवडा.




(1) 20 (2) 05 (3) 04 (4) 10

95. एका दोन अंकी संख्येतील अंकाची बेरीज 8 आहे, दशम स्थानातील अंक एकम् स्थानाच्या अंकांच्या तिप्पट असेल तर ती संख्या कोणती ?

(1) 62 (2) 53 (3) 71 (4) 93

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**96.** भिन्न संख्या ओळखा.

09, 10, 16, 49, 64

(1) 09 (2) 10 (3) 16 (4) 64

---

**97.** सांकेतिक भाषेत '230' ला HGJ असे लिहिले तर, '486' कसे लिहाल ?

(1) FBD (2) FCA (3) EIG (4) GHI

---

**98.** राधिका घरापासून 12 मीटर उत्तरेकडे गेली व पश्चिमेकडे वळून 8 मीटर गेली, नंतर दक्षिण दिशेला वळून 3 मीटर अंतर पार करून पूर्वेकडे 8 मीटर अंतर चालली, तर ती घरापासून कोणत्या दिशेला आहे ?

(1) पूर्व (2) पश्चिम (3) दक्षिण (4) उत्तर

---

**99.** सुधीरच्या आत्याची वहिनी अजयची आई आहे, तर सुधीरचे वडील अजयचे कोण ?

(1) वडील (2) चुलतभाऊ (3) मामा (4) भाचा

---

**100.** झऱ्याला ओढा म्हंटले, ओढ्याला धबधबा म्हंटले, धबधब्याला नदी म्हंटले व नदीला नाला म्हंटले तर होडी कशात चालेल ?

(1) नदी (2) नाला (3) ओढा (4) धबधबा

---

**101.** एका सांकेतिक भाषेत HAND = 27 तर LEG = ?

(1) 23 (2) 26 (3) 25 (4) 24

---


**102.** दिलेल्या पर्यायापैकी प्रश्नचिन्हाच्या जागी येणारी संख्या कोणती ?


| | | |
|---|---|---|
| 3 | 2 | 4 |
| 27 | ? | 64 |
| 9 | 4 | 16 |

(1) 8 (2) 12 (3) 16 (4) 18

---

**103.** पुढील आकृत्यांची मालिका पूर्ण करा.




(1)  (2)  (3)  (4) 

---

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

104. 8 मजूर एक काम 5 दिवसात करतात तर 20 मजूर तेच काम किती दिवसात करतील ?

(1) 2, $\frac{1}{2}$ दिवस (2) 8, $\frac{1}{3}$ दिवस (3) 2 दिवस (4) 3 दिवस


105. प्रश्न चिन्हाच्या जागी काय येईल ?
6 : 72; 8 : ?

(1) 92 (2) 80 (3) 128 (4) 96

106. जर O + H + P = 39; E + J + O = 30 तर D + I + P + L + O + M + A = ?

(1) 71 (2) 69 (3) 70 (4) 77

107. वर्तुळाच्या भोवती असलेल्या अंकांचे संबंध शोधून प्रश्न चिन्हाच्या जागी कोणता अंक येईल तो पर्यायांमधून निवडा.




(1) 256 (2) 225 (3) 676 (4) 324

108. साडे तीन वाजता तासकाटा व मिनिटकाटा यांच्यात किती अंशाचा कोन असेल ?

(1) 65° (2) 75° (3) 180° (4) 92°

109. 38, 66, 102, 146, ?

(1) 198 (2) 223 (3) 253 (4) 625

110. एका काटकोन चौकोनाकृती क्षेत्राची लांबी ही रुंदीपेक्षा 21 मीटरने जास्त आहे आणि काटकोनाचा कर्ण मोठ्या बाजूपेक्षा 6 मीटरने जास्त आहे तर त्या क्षेत्राची लांबी, रुंदी काढा.

(1) 24, 45 मी. (2) 45, 24 मी. (3) 24, 24 मी. (4) 45, 45 मी.

111. 2, 4, 6, 8, ?

(1) 10 (2) 12 (3) 14 (4) 16

112. 5 जून या पर्यावरण दिनानिमित्त इ. 10 वी. च्या विद्यार्थ्यांना गणित शिक्षकाने एकूण तीनशे रोपे देऊन समद्विभुज त्रिकोणाकृती जमिनीवर वृक्षारोपण करण्यास प्रवृत्त केले. पहिल्या रांगेत समद्विभुज त्रिकोणाकृतीच्या टोकावर एक रोप लावून प्रत्येक रांगेत रोपांची संख्या 1 ने वाढविण्यास सांगितले. तर त्रिकोणाकृतीचा पाया असलेल्या शेवटच्या रांगेत किती रोपे लावली जातील ?

(1) 12 (2) 24 (3) 36 (4) 48



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

113. एक दुकानदार 32 रु. छापील किंमतीची एक औषधाची बाटली ग्राहकाला 40 रु. स विकतो. पहिल्या व्यवहाराच्या वेळी प्रथम व्यापाऱ्यास ती वस्तू छापील किंमतीस मिळाली, त्याने ती दुय्यम व्यापाऱ्यास 36 रु. ला विकली होती. मूल्यवर्धित कराचा दर 12.5% असल्यास प्रत्येक व्यवहाराच्या वेळी द्यावा लागलेला कर माहित करा.

(1) 4 रु., .50 रु., .50 रु.
(2) 4 रु., 4.50 रु., 5 रु.
(3) 4 रु., 4 रु., 5 रु.
(4) 4 रु., 4.50 रु., 4.50 रु.

114. 12,000 रु., मुद्दलाची 12% दराने किती वर्षात दाम दुप्पट होईल ?

(1) 8 वर्षे
(2) $8\frac{1}{2}$ वर्षे
(3) 15 वर्षे
(4) $8\frac{1}{3}$ वर्षे

115. प्रत्येक तासाला घड्याळात त्यावेळी जितके वाजले असतील तितके टोल पडतात. तर 24 तासात एकूण किती टोल पडतील ?

(1) 154
(2) 156
(3) 158
(4) 152

116. 180 कि.मी. अंतर एका चालकाने ताशी 60 कि. मी. वेगाने जाताना व ताशी 40 वेगाने येताना गाडी हाकली, तर गाडीचा ताशी सरासरी वेग किती कि.मी. ?

(1) 48
(2) 45
(3) 50
(4) यापैकी नाही

117. प्रश्न चिन्हाच्या जागी कोणती संख्या येईल ?
51, 50, 48, 45, 41, 36, ?, ?

(1) 30, 24
(2) 31, 24
(3) 23, 30
(4) 30, 23

118. खालील प्रश्नात पाच शब्द दिले आहेत. योग्य तो निकष वापरून या संज्ञांचा क्रम लावल्यास मध्यभागी कोणते पद येईल ते ओळखा.
चिरा, रेती, खडक, शिलाखंड, खडा

(1) खडा
(2) रेती
(3) चिरा
(4) खडक

119. पायल हिचा जन्म 18 आक्टो. 1993 रोजी झाला. त्यावर्षी गांधीजयंती शनिवारी होती. तर पायलचा आठवा वाढदिवस कोणत्या वारी येईल ?

(1) गुरुवार
(2) बुधवार
(3) सोमवार
(4) रविवार

120. सदऱ्याला कोट म्हंटले, कोटाला पागोटे म्हंटले, पागोट्याला साडी म्हंटले, साडीला धोतर म्हंटले आणि धोतराला सदरा म्हंटले तर डोक्यावर घालण्यासाठी काय वापरायचे ?

(1) कोट
(2) पागोटे
(3) साडी
(4) धोतर

121. खालील प्रश्नांमध्ये प्रथम संख्यांना गट दिलेला आहे. त्या गटाचे काही वैशिष्ट्य आहे. ते ओळखून त्या गटात बसू शकणारे पद दिलेल्या पर्यायांतून शोधा.
28, 9, 65, 2

(1) 50
(2) 215
(3) 82
(4) 126

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**122.** खाली दिलेल्या शब्दाशी व्याकरणाच्या दृष्टीने साम्य असलेला शब्द पर्यायांमधून ओळखा.
गर्विष्ठ

(1) बंडाळी (2) धिटाई (3) भूक (4) दयावंत


---

**123.** एका सांकेतिक भाषेत 'जननमरण' हा शब्द जाननामराण असा लिहिला जातो, तर त्या लिपीत सकलमंगल हा शब्द कसा लिहाल ?

(1) सकालमंगाल (2) साकलामंगाल (3) साकलामंगला (4) सकाळमांगल

---

**124.** खालील आकृतीत चौरस किती ?



(1) 25 (2) 28 (3) 30 (4) 32


---

**125.** एका नावेत सरासरी 22 कि.ग्रॅ. वजनाची 25 मुले बसली. नावाड्यासह सर्वांचे सरासरी वजन 24 कि.ग्रॅ. झाले तर नावाड्याचे वजन किती ?

(1) 74 कि. ग्रॅ. (2) 71 कि. ग्रॅ. (3) 75 कि. ग्रॅ. (4) 100 कि. ग्रॅ.

---

प्रश्न क्रं. **126** ते **129** या प्रश्नांची उत्तरे खालील आकृतीवरून द्या.




**126.** 13 या अंकाच्या जागी कोणते अक्षर येईल ?

(1) A (2) M (3) J (4) O

---



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

127. 27 या अंकाच्या जागी कोणते अक्षर येईल ?
(1) X (2) Z (3) Y (4) W

128. P या अक्षराच्या जागी कोणता अंक येईल ?
(1) 16 (2) 19 (3) 18 (4) 21

129. K या अक्षराच्या जागी कोणता अंक येईल ?
(1) 12 (2) 16 (3) 19 (4) 14

130. जर A = गुणाकार, B = बेरीज, C = भागाकार, D = वजाबाकी तर 150 ही संख्या अशी लिहिता येईल.
(1) (15 D 3) A 12 B 6 (2) (15 B 3) A 8 B 6
(3) (15 C 3) A 30 (4) वरील सर्व

131. एका वर्गातील विद्यार्थ्यांची वयाची सरासरी 12 वर्षे आहे. त्यापैकी 25 विद्यार्थ्यांची वयाची सरासरी 10 वर्षे आहे. उरलेल्या विद्यार्थ्यांची वयाची सरासरी 14 वर्षे आहे. तर वर्गातील एकूण विद्यार्थ्यांची संख्या किती ?
(1) 30 (2) 40 (3) 50 (4) 70

132. एका कामावरील मजुरांच्या संख्येत 55% वाढ केल्यानंतर एकूण मजुरांची संख्या 93 झाली. तर प्रारंभी मजुरांची संख्या किती होती ?
(1) 70 (2) 50 (3) 80 (4) 60

133. 131 × 9999 = किती ?
(1) 1309869 (2) 999069 (3) 1000869 (4) 1319999

134. रमेशने एका परीक्षेत 800 पैकी 640 गुण मिळवले व महेशने 700 पैकी 525 गुण मिळवले. तर दोघांच्या गुणांच्या शेकडेवारीत फरक किती ?
(1) 3% (2) 5% (3) 8% (4) 7%

135. 83796 या संख्येतील 3 व 9 यांच्या स्थानिक किंमतीची वजाबाकी केल्यास येणारी संख्या कोणती ?
(1) 3706 (2) 2900 (3) 2910 (4) 3700

136. 50 पेक्षा मोठ्या व 70 पेक्षा लहान असणाऱ्या मूळ संख्यांची सरासरी किती ?
(1) 80 (2) 60 (3) 65 (4) 70

137. 7316 ला 40 ने भागले तर येणारी बाकी किती ?
(1) 16 (2) 4 (3) 26 (4) 36

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**138.** 7 क्रमवार सम संख्यांची सरासरी 146 आहे. तर त्यांच्यापैकी सर्वात मोठी संख्या कोणती ?

(1) 146 (2) 140 (3) 150 (4) 152

**139.** $\sqrt{25} + 3\sqrt{125} + \sqrt{0.25} + 3\sqrt{0.125}$ = किती ?

(1) 31.05 (2) 31.25 (3) 6.25 (4) 5

**140.** एका चौरसाकृती मैदानाची प्रत्येक बाजू 120 मी. आहे. त्या मैदानाभोवती 5 फेऱ्या मारल्यास किती अंतर कापले जाईल ?

(1) 2.8 कि.मी. (2) 2.4 कि.मी. (3) 480 मी. (4) 600 मी.

**141.** एका विमानाचा ताशी वेग 800 कि.मी. आहे तर $3\frac{1}{4}$ तासात ते किती अंतर कापेल ?

(1) 2600 कि.मी. (2) 2060 कि. मी. (3) 2800 कि. मी. (4) 2080 कि. मी.

**142.** 7.25 मी. – 7 मी. 25 से.मी. + 4 मी. 1 से. मी. = ?

(1) 0 मी. (2) 4.01 मी. (3) 18.51 मी. (4) 4.1 मी.

**143.** कंसातील दराप्रमाणे खालील चलनाचे रुपयात रूपांतर करा. 13000 यु. एस. डॉलर (1 डॉलर = 45.95 रु.)

(1) 59700 रु. (2) 59795 रु. (3) 59735 रु. (4) 597350 रु.

**144.** एका परीक्षेत शेकडा 40 उमेदवार हिंदीत नापास झाले. शेकडा 30 इंग्रजीत नापास झाले. शेकडा 10 दोन्ही विषयात नापास झाले. उरलेले दोन्ही विषयात पास झाले तर दोन्ही विषयात पास झालेले उमेदवार किती ?

(1) शेकडा 40 (2) शेकडा 30 (3) शेकडा 10 (4) शेकडा 20

**145.** जर 60 किलो गव्हाची किंमत 960 रु. असेल तर 25 किलो गव्हाची किंमत किती ?

(1) 380 रु. (2) 450 रु. (3) 560 रु. (4) 400 रु.

**146.** अजयचा मासिक पगार 2450 रुपये आहे त्याचा मासिक खर्च 2100 रुपये आहे, तर तो एका वर्षात एकूण किती रकमेची बचत करतो ?

(1) 4200 रु. (2) 4800 रु. (3) 2400 रु. (4) 8400 रु.

**147.** दहा माणसांच्या समूहातील 25 वर्षे वयाचा एक माणूस बदलून, नवीन माणूस आल्यास, दहा माणसांचे सरासरी वय पूर्वीपेक्षा 2 वर्षाने वाढते तर नवीन माणसाचे वय किती ?

(1) 45 वर्षे (2) 44 वर्षे (3) 40 वर्षे (4) 42 वर्षे

**148.** एका रकमेची सरळव्याजाने रास 7 वर्षात दुप्पट होते. तर त्याच दराने, त्याच रकमेची रास किती वर्षांने चौपट होईल ?

(1) 14 वर्षे (2) 20 वर्षे (3) 22 वर्षे (4) 21 वर्षे



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**149.** तीन क्रमीत विषम संख्यांची बेरीज 147 आहे तर मधील संख्या कोणती ?

(1) 47 (2) 39 (3) 49 (4) 43

---

**150.** सोडवा: 5 किलो + 350 ग्रॅम − 1 किलो − 500 ग्रॅम =

(1) 4 किलो 150 ग्रॅम (2) 5 किलो (3) 4 किलो 850 ग्रॅम (4) 3 किलो 850 ग्रॅम

---

**151.** एका व्यापारातील राम, मोहन, शाम ह्यांची भागीदारी 5 : 6 : 9 ह्या प्रमाणात आहे. व्यापारात 24000 रुपयांचा फायदा झाल्यास एकट्या शामला किती फायदा होईल ?

(1) 6000 रु. (2) 7200 रु. (3) 10800 रु. (4) 1080 रु.

---

**152.** दोन संख्याचा म. सा. वि. व ल. सा. वि. अनुक्रमे 6 आणि 72 आहे. एक संख्या दुसरीच्या $\frac{3}{4}$ पट असेल तर मोठी संख्या कोणती ?

(1) 12 (2) 16 (3) 18 (4) 24

---

**153.** उमेश आणि महेश ह्यांच्या आजच्या वयांचे गुणोत्तर 2 : 3 आहे. 5 वर्षांनंतर हे गुणोत्तर 3 : 4 असे होईल, तर महेशचे आजचे वय किती ?

(1) 10 वर्षे (2) 5 वर्षे (3) 15 वर्षे (4) 20 वर्षे

---

**154.** तीन मुलांचे सरासरी वय 30 वर्षे आहे. त्यांच्या वयांचे गुणोत्तर 3 : 5 : 7 असे आहे तर सर्वात लहान मुलाचे वय किती ?

(1) 42 वर्षे (2) 30 वर्षे (3) 18 वर्षे (4) 15 वर्षे

---

**155.** राजेशची उंची महेशच्या उंचीपेक्षा 20% ने कमी आहे. तर महेशची उंची राजेशपेक्षा किती टक्क्याने अधिक आहे ?

(1) 20 % (2) 25 % (3) 18 % (4) यापैकी कोणतेही नाही

---

**156.** 'अ' व 'ब' ह्या गावांतील अंतर 927 कि. मी. आहे. ताशी 91 कि. मी. वेगाने 'अ' गावातून निघालेली गाडी 4 तासाने 'क' गावी पोहोचते तर 'ब' गावी पोहोचण्यास गाडीस अजून किती अंतर कापावयाचे आहे.

(1) 560 कि. मी. (2) 561 कि. मी. (3) 562 कि. मी. (4) 563 कि. मी.

---

**157.** खालील बेरीज करा.

6.12 + 0.0612 + 61.2 + 0.612

(1) 679. 932 (2) 67.9932 (3) 68.9932 (4) 67.8933

---

**158.** रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा.

$$6^{\frac{3}{5}} \div \left(6^{2}\right)^{\frac{1}{10}} = 6^{\boxed{-}}$$

(1) $\frac{3}{5}$ (2) $\frac{2}{5}$ (3) $\frac{4}{5}$ (4) $\frac{1}{5}$

---

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

159. खाली दिलेल्या बेरजेच्या उदाहरणामध्ये अ, ब, क, च्या किंमती काढा.

 82 अ
+ ब 79
+ 8क 5
 2031

(1) अ = 7, ब = 3, क = 2 (2) अ = 5, ब = 3, क = 2
(3) अ = 7, ब = 3, क = 1 (4) अ = 7, ब = 4, क = 2

---

160. जर $357 \times 289 = 103173$ तर
103. 173 ÷ 2.89 = किती ?

(1) 3.57 (2) 35.7 (3) 0.357 (4) 0.0357

---

161. जर 4, 9, 8 आणि क्ष यांची सरासरी 7 आणि 20, 2, क्ष आणि य यांची सरासरी 12 असेल तर य ची किंमत काय असेल ?

(1) 16 (2) 17 (3) 18 (4) 19

---

162. 22201 ते 22301 या तिकीटांच्या सिरीजची सर्व सिनेमाची तिकीटे विकली गेली. एकूण रु. 2727 जमा झाले ; तर एका तिकीटाची किंमत किती ?

(1) रु. 27.27 (2) रु. 27 (3) रु. 20 (4) रु. 25

---

163. 6355 या संख्येला 13 ने भाग जाणेसाठी, लहानात लहान कोणती संख्या मिळविली पाहिजे ?

(1) 2 (2) 3 (3) 0 (4) 1

---

164. 55555-5555-555 = किती ?

(1) 49555 (2) 50000 (3) 49445 (4) 45555

---

165. राज्य सरकारने शाळाना 2054280 रुपयांचे संगणक व 204345 रुपयांचे दूरदर्शन संच दिले, तर शासनाने एकूण किती रुपये खर्च केले ?

(1) 2258625 (2) 2158625 (3) 2258825 (4) 2257625

---

166. सोपे रूप द्या.
948708 + 205405 - 186612 = किती ?

(1) 957501 (2) 967502 (3) 967603 (4) 967501



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

167. रमणचे मासिक उत्पन्न 15,000 रु. आहे त्यातील 9,000 रु. खर्च होतात व उरलेली रक्कम शिल्लक राहते. तर तो मासिक उत्पन्नाच्या शेकडा किती बचत करतो ?

(1) 10 (2) 20 (3) 30 (4) 40

168. सोडवा :

$$\frac{0.4 \times 0.4 \times 0.4}{0.04 \times 0.4} = ?$$

(1) 0.04 (2) 4 (3) 0.4 (4) 40

169. एका शासकीय विभागात 72 कर्मचारी आहेत. त्यापैकी निम्म्या महिला आहेत. आणि उरलेल्याच्या 1/3 हे अविवाहित आहेत. तर विवाहित पुरुषांची संख्या किती ?

(1) 12 (2) 36 (3) 48 (4) 24

170. 10 संगणक सीडींची किमंत 6.50 रु. आहे. विक्रेत्याने प्रत्येक सीडी 0.95 रु. ना विकली तर त्याला किती टक्के फायदा झाला ?

(1) 0.2% (2) 46.2% (3) 5.6% (4) 4.62%

171. There is a word spelt in four different ways. Out of them only one is correct. Which one is correct ?

(1) enmity (2) enemity (3) enimity (4) enimety

172. Which one of the following is the correctly spelt word ?

(1) dilogue (2) dialogue (3) dialague (4) dielague

173. Choose the correct spelling.

(1) qwarel (2) quarrelled (3) qwareled (4) quaralled

174. Fill in the blank with the correct word.

The ______________ has undergone a complete change in the present days.

(1) Whether (2) Weather (3) Wheather (4) Whither

175. Sita values her mother's ________________ .

(1) advise (2) advice (3) addvice (4) addvise

176. 'How tall you have grown !'

What kind of sentence is this ?

(1) declarative (2) interrogative

(3) imperative (4) exclamatory

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

177. She jumped off the bus while it ____________

Choose the correct alternative from the following to fill in the blank :

(1) moved (2) was moving (3) had moved (4) will be moving

---

178. Change the following into indirect speech :

He said to me, "Where are you going ?"

Choose the correct sentence from the following :

(1) He told me where was I going.

(2) He asked me that where was I going ?

(3) He asked me where I was going.

(4) He asked to me where I was going.

---

179. 'What ___________ excellent speech he made !'

Choose the correct article from the following :

(1) the (2) an (3) a (4) no article

---

180. 'I took to cricket as a duck takes ____________ water.'

Select the correct preposition from the following :

(1) to (2) on (3) from (4) of

---

181. Out of the four sentences one is correctly punctuated. Select the correct sentence from the following :

(1) Oh ! What a tragedy ? (2) Oh ! What a tragedy.

(3) Oh ! What a tragedy ! (4) Oh ? What a tragedy ?

---

182. Choose the correct sentence from the following :

(1) If he had studied hard, he has got a first class.

(2) If he had studied hard, he would have got a first class.

(3) If he had studied hard, he have got a first class.

(4) If he had studied hard, he would got a first class.

---

183. Peter broke a jug, ____________ .

Choose the correct question tag from the following alternatives to fill in the blank :

(1) didn't he ? (2) did he ? (3) didn't Peter ? (4) does he ?

---

184. 'All that glitters is not gold.'

The correct transformation of this sentence into simple sentence is ____________

(1) All glittering things are gold. (2) All glittering things are not gold.

(3) All things are gold. (4) All things are golden.

---



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

185. The ship had ________________ before help arrived.
Choose the correct verb form from the following alternatives to fill in the blank.
(1) sank (2) sinks (3) sink (4) sunk

186. Change the following into indirect speech :
The teacher said, "Two and two make four."
Choose the correct sentence from the following :
(1) The teacher said that two and two made four.
(2) The teachers says that two and two made four.
(3) The teacher said that two and two makes four.
(4) The teacher says that two and two make four.

187. He must not attempt to escape or he will be put to death.
This is a ____________ sentence.
(1) Simple (2) Complex (3) Compound (4) Complex Compound

188. Choose the correct alternative to fill in the blank.
Before we had finished our meal, he ______________ us back to work.
(1) ordered (2) has ordered (3) was ordering (4) orders

189. Which of the following alternatives is the correct passive form of the following sentence ?
Can anybody do this work ?
(1) Can this work be done by anybody ?
(2) Can this work done by anybody ?
(3) This work can be do by anybody.
(4) Can anybody be done this work ?

190. Choose the appropriate word to fill in the blank.
They were talking among ____________
(1) yourself (2) yourselves (3) ourselves (4) themselves

191. Choose the correct preposition to fill in the blank.
I have eaten nothing ____________ yesterday.
(1) for (2) until (3) since (4) till

192. Choose the correct tense form of the verb in the bracket to complete the sentence.
My uncle ____________ (want) to know how I am doing my business.
(1) was wanting (2) wanted
(3) have wanted (4) want

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

193. The underlined phrase in the following sentence means ______________
Was it proper on your part to look down upon poor relatives ?
(1) neglect (2) despise (3) hate (4) criticise

194. Choose the most appropriate conjunction to fill in the blank.
He did not die ______________ the doctor treated him will.
(1) and (2) but (3) or (4) as

195. Which one of the following is closest to the opposite in meaning of the word, 'definite' ?
(1) vague (2) unusual (3) blunt (4) shallow

196. The underlined idiom in the following sentence means ____________
People these days want to be rich overnight ; naturally they try to earn money by hook or crook.
(1) by legal or illegal ways
(2) by fair or foul means
(3) by suitable or unsuitable measures
(4) by chance or by accident

197. Choose the correct meaning from the following :
'to dictate letters' mean __________
(1) to take down letters (2) to read letters
(3) to open letters (4) to say words aloud to be written

198. After the word, four meanings are given. Choose the correct alternative from the following :
Directory ______________
(1) office of a director (2) officer
(3) telephone (4) a book giving information

199. A hardware or software device that is able to modify data according to instructions is called a ________________
Choose the correct word from the following :
(1) professor (2) processor (3) process (4) possession

200. Choose the correct question tag to fill in the blank.
I am the happiest man in my town, ______________
(1) amn't I ? (2) aren't I ? (3) am I ? (4) isn't I ?

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

## सूचना – (पृष्ठ 1 वरून पुढे....)

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत: बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षा कक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग -1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

---

### नमुना प्रश्न

प्रश्न क्र. **201.** "अंगावर काटा उभा रहाणे" या वाक्यप्रचाराचा अर्थ काय ?

(1) अंग शहारणे
(2) रोमांचित होणे
(3) अतिशय भीती वाटणे
(4) बहरून येणे

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) अतिशय भीती वाटणे" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल. यास्तव **खालीलप्रमाणे** प्र. क्र. **201** समोरील उत्तरक्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

प्रश्न क्र. **201.** ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तरक्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

**कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK**

SEAL

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial